महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम १९६२ नुसार शिक्षण उपकर आणि रोजगार हमी उपकर वसुली तसेच वसुलातीची रक्कम शासकिय कोषागारामध्ये वेळेवर जमा करणे आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आगाऊ स्वरूपात कपात न करणेबाबत

आयुक्त व संचालक नगरपरिषद प्रशासन
शासकीय परिवहन सेवा इमारत
३रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ३०.
परिपत्रक क्र. नपप्रस/का.८/महागाई भत्ता/२००४-०५/५०७
दि. १२ जुलै २००४

वाचा - १) महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम १९६२
२) न.प.प्र.सं.पत्र क्र.एमआय एस १०८३/सीआर २६०/३/१ दि. २१/३/१९८४

## परिपत्रक

महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम १९६२ नुसार महाराष्ट्र शासनाने नगरपरिषदांच्या हद्दीमधील इमारतींवर शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर बसविला आहे. हे दोन्ही उपकर वसूल करण्याची जबाबदारी नगरपरिषदांची आहे. तसेच विहित कालमर्यादेमध्ये वसुल केलेला उपकर शासकिय कोषागारामध्ये जमा करणे आवश्यक आहे. काही जिल्ह्यामध्ये नगरपरिषदांनी वरील उपकर वसूल केलेला नसताना शासनाकडून त्यांना वितरीत झालेल्या अनुदानामधून जिल्हाधिकारी कार्यालयांनी उपकराच्या रकमा आगाऊ स्वरूपामध्ये कपात करण्याची बाब या संचालनालयाच्या निर्दशनास आलेली आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम १९६२ मध्ये नमूद केल्यानुसार नगरपरिषद हद्दीमधील जमिनी तसेच निवासी आणि बिगर निवासी इमारतींच्या करयोग्य मुल्यांवर आधारीत उपकराची वसूली करून वसूली करण्यात आलेली रक्कम शासकिय कोषागारामध्ये महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर नियम १९६२ मध्ये दिलेल्या विहित कालमर्यादेमध्ये न चुकता जमा करावी.

२) नगरपरिषदांनी उपकराच्या वसूल केलेल्या रकमा विहित कालावधीमध्ये जमा केल्या नसल्यास ही बाब नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या निदर्शनास आणावी.

३) जिल्हाधिकाऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये नगरपरिषदांनी वसूल न केलेल्या उपकराच्या रकमा आगाऊ स्वरूपामध्ये नगरपरिषदेच्या अनुदानामधून कपाती करु नयेत.

वरील निदेशाची तात्काळ अमंलबजावणी नगरपरिषदेची मुख्याधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी करावी.

(सुनील सानी)
आयुक्त व संचालक, नगरपरिषद प्रशासन

प्रत :
१. मा. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३०.
२. विभागीय आयुक्त (सर्व) ३. जिल्हाधिकारी (सर्व)
४. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा)